दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक २४६ | MAHMAR/2006/17212 | रायगड | बुधवार, दि.३ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित


## 'दितवा'चा प्रभाव! पाऊस झाला आता थंडी कहर करणार?

**दै.रायगड नगरी । मुंबई**

दितवा चक्रीवादळाचा प्रभाव महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांमध्ये दिसत आहे. दितवा चक्रीवादळामुळे अनेक ठिकाणी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली होती. आंध्र प्रदेश, तामिळनाडू, कराईकल आणि तेलंगणात जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. कर्नाटकात सोसाट्याचे वारे वाहतील, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. परंतु, अनेक भागात तापमानात घट झाल्याचे पाहायला मिळत असून, थंडीत वाढ होणार असल्याचे सांगितले जात आहे.

प्राप्त माहितीनुसार, उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांचा प्रभाव पुढील काही दिवस कायम राहू शकतो. यामुळे राज्यातील काही भागात थंडीच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. मुंबईत मागच्या काही वर्षातील सर्वात निचांकी तापमानाची नोंद झाली. त्यामुळे पुढील काही दिवस मुंबईतही गारठा कायम राहणार असल्याचे म्हटले जात आहे. यंदाच्या हिवाळ्यात डिसेंबर ते फेब्रुवारी या कालावधीत महाराष्ट्र तसेच मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान, हरियाणा आणि पंजाब या भागात तीव्र थंडीच्या लाटेचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

### रायगड मध्ये ७५ टक्के मतदान

# मतदान प्रक्रियेला महाड, रोह्यात गालबोट ; माथेरानमध्ये ५ लाखाची रोकड हस्तगत

## अलिबाग, सह अनेक ठिकाणी मतदान यंत्रात बिघाड



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यातील १० नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकी करिता मंगळवारी मतदान प्रक्रिया पार पडली. सकाळी मोजक्याच केंद्रांवर थंडीतही उत्साह दिसून आला. मात्र दुपारनंतर खऱ्या अर्थाने केंद्रांवर रांगा पहायला मिळाल्या. महाड मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस ( अजित पवार),आणि शिवसेना (शिंदेगट) यांच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या हाणामारीच्या घटनेने मतदान प्रक्रियेला गालबोट लागले. रोह्यातही राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपाचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले.तर माथेरान मध्ये एकाला ५ लाखाची रोकड घेऊन जाताना पोलिसांनी पकडले. अलिबागसह जिल्ह्यातील काही मतदार केंद्रांत मतदान यंत्रणेत बिघाड झाल्याने काही काळ मतदान प्रक्रिया थांबल्याच्या घटना घडल्या. शेवटचे वृत्त हाती येईपर्यंत जिल्ह्यात ७५ टक्के इतके मतदान झाले.

जवळपास साडे तीन ते चार वर्ष प्रलंबित राहिलेल्या नगरपालिका निवडणुकीसाठी २ डिसेंबर २९२५ चा मुहूर्त मिळाला. १७ नोव्हेंबर पासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. २१ नोव्हेंबर ही अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख होती. त्या नंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले. प्रत्यक्षात खऱ्या अर्थाने निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात झाली. १० नगराध्यक्ष पदासाठी ३४ उमेदवार रिंगणात आहेत. तर नगरसेवक पदासाठी ५७५ उमेदवारांचे भवितव्य आज मतदान यंत्रात बंद झाले .

जिह्यात आघाडी आणि युतीचा घोळ पाहायला मिळाला. राज्यात सत्तेत असलेल्या युती मध्ये फूट पडल्याचे दिसून आले. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेचे चांगलेच बिनसल्याचे या निवडणुकीच्या निमित्ताने दिसून आले. दरम्यान मंगळवारी सकाळी साडे सात वाजल्या पासून मतदान प्रक्रिया सुरू झाली.

गेली दोन दिवस वातावरण थंड आहे. थंडीचा जोर वाढला आहे. मंगळवारी सकाळी अलिबाग मध्ये मतदान केंद्रांवर मतदारांनी दाखवलेला उत्साह कौतुकास्पद होता. त्यानंतर हळूहळू मतदार घराबाहेर पडू लागले. दुपारी जेवल्यानंतर पुन्हा मतदान केंद्रांवर रांगा पहायला मिळाल्या. दुपारी साडे तीन वाजेपर्यंत संपूर्ण जिल्ह्यात ५४ टक्के मतदान झाले होते.

राज्यात सत्तेत असलेल्या शिवसेना (शिंदे गट), आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या दोन पक्षातील रायगडच्या नेत्यांमध्ये

निर्माण झालेली दुही काही कमी होण्याची चिन्ह नाही. कारण नगरपालिका निवडणुकीसाठी महाड मध्ये हे दोन्ही पक्ष एकमेकांविरोधात लढत आहेत. मंगळवारी मतदानाच्या दिवशी दोन्ही पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाल्याची घटना घडली. पोलिसांच्या उपस्थितीत हा राडा झाला. रोहा शहरात देखील मतदारांना पैसे वाटण्याच्या मुद्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपाच्या कार्यकर्त्यांमध्ये धुमश्चक्री उडाली. जिल्ह्यात अन्य ठिकाणी तुरळक घटना वगळता मतदान शांतता पूर्ण वातावरणात पार पडले.

नगरपालिका निवडणुकीची मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर दुसऱ्या दिवशी मतमोजणी होणार होती. पण वादग्रस्त जागांच्या याचिकेमुळे उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सर्वच नगरपालिकेची मतमोजणी २१ डिसेंबर रोजी करण्याचा निर्णय दिल्याने जिल्ह्यात चर्चेला उधाण आले. सत्ताधारी आणि विरोधकांनी देखील नाराजी व्यक्त केली. इतक्या उशिराने होणाऱ्या मतमोजणी मुळे पोलिस आणि प्रशासकीय यंत्रणेवर ताण येईल. यासह इतर तर्कवितर्क लढविण्यात येत आहेत.

# पेण नगरपालिकेची निवडणूक शांततेत पार; ७०.३०% मतदान

**दै.रायगड नगरी । पेण**

आज दि. २ डिसेंबर रोजी सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० दरम्यान पेण नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची प्रक्रिया अत्यंत शांततेत पार पडली. कुठेही अनुचित प्रकार न घडता मतदान सुरळीत पार पडल्याने पेणकरांनी लोकशाहीची कास धरल्याचे चित्र स्पष्ट दिसले. निवडणुकीपूर्वी राजकीय आरोप-प्रत्यारोप, चिखलफेक, सौदेबाजी आणि पक्षांतर्गत खदखद यामुळे निर्माण झालेले तापमान लक्षात घेता मतदान दिवशी शांततेचे वातावरण ही पेणकरांसाठी जमेची बाजू ठरली. दरम्यान दिवसभरात एकूण ७०.३०% मतदान झाल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.



या निवडणुकीत १२ प्रभागांमधून २४ नगरसेवक आणि एक थेट नगराध्यक्ष निवडून येणार आहेत. राजकीय समीकरणांच्या दृष्टीने यंदाची निवडणूक अधिकच चुरशीची ठरली. भाजप-राष्ट्रवादी महायुतीची युती (२४+१), तर दुसरीकडे शिवसेना शिंदे गटाची स्वतंत्र लढत(०५+००), तसेच शिशिर धारकर यांची आम्ही पेणकर आघाडी(०५+०१), संतोष श्रींगारपुरे यांची नगरविकास आघाडी(०४+००), काँग्रेस आणि मित्र पक्ष(००+०१) त्याचबरोबर मनसेचा स्वतंत्र लढा(०१+००) यामुळे बहुकोनी संघर्ष निर्माण झाला.

याचदरम्यान झालेल्या महत्त्वपूर्ण घडामोडींनी राजकीय समीकरणात मोठी उलथापालथ घडवून आणली. प्रभाग ९-अ मधील वसुधा तुकाराम पाटील यांची बिनविरोध निवड हा या निवडणुकीतील पहिला मोठा टप्पा ठरला. त्यानंतर झालेल्या छाननीत नगराध्यक्ष पदाचा एक व १७ नगरसेवकांचे अर्ज बाद झाल्यानंतर तर राजकीय वातावरणात आणखीच खळबळ उडाली. उमेदवारांचे तळ बदलणे, गटबाजी आणि चर्चा सतत वाढू लागल्या.

अर्ज माघारीसाठी अंतिम तारीख २१ नोव्हेंबर असतानाही दोन दिवस आधी ५ उमेदवारांनी माघार घेतली. परिणामी प्रभाग ५-ब मधून दीपक जयवंत गुरव आणि प्रभाग १२-ब मधून अभिराज कडू हे बिनविरोध निवडून आले.

निवडणूक प्रचाराच्या काळात बँकेचा मुद्दा, स्वच्छ पाणी, रस्ते यासारखे मूलभूत प्रश्न सर्वाधिक गाजले. सर्वच पक्षांनी एकमेकांवर आरोपांची सरबत्ती करत असताना विरोधकांनीही विविध मुद्द्यांची पो-लखोल करण्याची संधी साधली. शहरात मागील काही दिवसांत मोठ्या राजकीय चर्चांना आणि सौदेबाजीला उधाण आल्याचे दृश्य होते.

### अखेर सिडको प्रशासन जागे...

# चिपळे पूल ते नेरे रस्त्याच्या कामाला लवकरच होणार सुरुवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिडकोच्या नैना प्रकल्पांतर्गत येणाऱ्या चिपळे पूल ते नेरे रस्त्याच्या दुरुस्तीसंदर्भात अखेर सिडको प्रशासन जागे झाले असून, या रस्त्याच्या कामाला लवकरच सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली आहे. या विषयी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोचे लक्ष वेधून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली होती. त्यानुसार नागरिकांचा हा प्रश्न निकाली लागला आहे.

चिपळे पूल ते नेरे हा अत्यंत महत्त्वाचा आणि दररोजची रहदारी असलेला रस्ता असून, सध्या त्याची स्थिती अत्यंत दयनीय झाली आहे. यापूर्वी हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत होता, मात्र त्याचे सिडकोकडे हस्तांतरण झाल्यानंतर तो नैना हद्दीत समाविष्ट करण्यात आला आहे. रस्त्यावरील मोठमोठे खड्डे आणि उखडलेल्या भागांमुळे नागरिकांची ये-जा अत्यंत धोकादायक व त्रासदायक झाली आहे. त्यामुळे अपघातांचा धोका वाढला असून, नागरिकांमध्ये सिडकोविरोधात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. नागरिकांची मागणी आणि त्यांना होणाऱ्या गैरसोयीची दखल घेत, आमदार ठाकूर यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांना निवेदन देऊन सिडको अधिकाऱ्यांना या रस्त्याची दुरुस्ती तातडीने करण्याचे निर्देश देण्याची मागणी केली होती. तसेच हा रस्ता प्रचंड वर्दळीचा असल्याने त्याचे रुंदीकरण व काँक्रीटीकरण करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. त्यानुसार सिडकोच्या अधिकाऱ्यांनी या रस्त्याच्या कामाला लवकरच सुरुवात करण्यात येणार असल्याचे भाजपचे पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांना सांगितले. यामुळे प्रवाशी नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# उरणमध्ये तणावपूर्ण शांततेत मतदान प्रक्रिया पार

## उरण नगर परिषदेच्या निवडणुकीत कोण गुलाल उधळणार यांची सर्वांना उत्सुकता



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण नगर परिषदेची सार्वत्रिक-२०२५ ची निवडणूक प्रक्रिया मंगळवारी ( दि२) १० प्रभागावरील २९ बुच वर पार पडली.यावेळी सकाळ पासून मतदारांनी मतदान केंद्रावर आपली हजेरी लावून आ-पला मतदानाचा हक्क बजावला.मात्र काही ठिकाणी बाचाबाचीचे प्रकार झाल्याच्या घटना घडल्या.उरणचे आमदार महेश बालदी व माजी आमदार मनोहर शेठ भोईर यांनी सदरची निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. त्यामुळे मत मोजणीच्या दिवशी कोण गुलाल उधळणार यांची उत्सुकता सर्वांनाच लागून राहिली आहे.

उरण नगर परिषदेच्या निवडणुकीत एकूण २६ हजार दोनशे चौदा मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत.नगराध्यक्ष पदासाठी ४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून २१ नगर-सेवक पदासाठी ४९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे आहेत.भाजपाचे आमदार महेश बालदी यांनी हि निवडणूक प्रतिष्ठेची केली असून नगराध्यक्ष पदासाठी सौ. शोभा कोळी - शहा यांना उमेदवारी दिली आहे.तर माजी आमदार मनोहर शेठ भोईर यांनी महाविकास आघाडीच्या माध्यमातून भावना ताई घाणेकर यांना उमेदवारी दिली आहे.तसेच शिवसेना शिंदे गटानी सौ. रुपाली ठाकूर यांना नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी दिली आहे.

मात्र खरी लढत ही भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शोभा कोळी - शहा व महाविकास आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार भावना ताई घाणेकर यांच्यात होणार आहे.मंगळवारी मतदानाच्या दिवशी काही मतदार केंद्रावर बाचाबाचीचे प्रकार घडले.

यावेळी भाजपचे आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे,प्रितम म्हात्रे, जिल्हा सरचिटणीस चंद्रकांत घरत, जितेंद्र म्हात्रे ,पंडित घरत, सीमाताई घरत, सह इतर भाजपाचे पदाधिकारी यांनी मतदान केंद्रावर भेट देऊन १०० टक्के मतदारांचा कौल आपल्यालाच असल्याने भाजपाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार व २१ नगर-सेवक पदाचे उमेदवार विजयी होतील असा विश्वास व्यक्त केला.महाविकास आघाडीकडून खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा,माजी आमदार मनोहर शेठ भोईर,माजी आमदार बाळाराम पाटील, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेंद्र शेठ घरत, उपजिल्हा प्रमुख नरेश रहाळकर, तालुका प्रमुख संतोष ठाकूर, शेकापचे तालुका चिटणीस रवि घरत यांनी मतदान केंद्रावर भेट देऊन पोलीस यंत्रणेला शांततेत मतदान प्रक्रिया पार पडण्याचे सुचित केले.मात्र मत मोजणीच्या दिवशी काही केंद्रावर बाचाबाचीचे प्रकार झाल्याच्या घटना घडल्याने शांततेत मतदान प्रक्रिया पार पडण्यासाठी पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे.संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ७५ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला असला तरी २१ डिसेंबरला निकालाच्या दिवशी गुलाल उधळणार कोण याची उत्सुकता सर्वांनाच लागून राहिली आहे.

# पनवेल महानगरपालिकेच्या वतीने लायन्स उद्यानाचे नुतनीकरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक उद्याने अधिक सुंदर, सुरक्षित आणि नागरिकांसाठी उपयुक्त करण्याच्या उद्देशाने महानगरपालिकेमार्फत ठाणेनाका रोडवरील लायन्स उद्यानाचे नुतनीकरण व सुशोभीकरण करण्यात आले आहे.



महानगरपालिकेचे आयुक्त मा. मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार आणि उपआयुक्त नानासाहेब कामठे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ पनवेल - सुंदर पनवेल करण्याच्या दृष्टीने उद्यान विभागाच्यावतीने ठाणेनाका रोडवरील लायन्स उद्यानाचे नुतनीकरण करण्यात आले आहे. उद्यानाच्या नुतीनकरणामध्ये उद्यानामध्ये नवीन आकर्षक प्रकाशयोजना करण्यात आली आहे. त्यामुळे रात्रीही उद्यान पाहण्यास सुंदर आणि सुरक्षित बनले असून नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

उद्यानाच्या नुतनीकरणाची सर्व कामे सहायक आयुक्त डॉ. रुपाली माने आणि उद्यान विभाग प्रमुख अनिल कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान पर्यवेक्षक सिद्धार्थ कांबळे, कनिष्ठ अभियंता साकेत पाटील तसेच सहाय्यक पर्यवेक्षक अशोक मुने, किरण गायकवाड व गजलक्ष्मी आंबे यांच्या सहकार्याने पार पडली. पनवेल महानगरपालिकेने पुढील काळात शहरातील इतर उद्यानांचेही सुधारणा व सौंदर्यीकरण करण्याची योजना हाती घेतली आहे. नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि आधुनिक, सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा महापालिकेचा संकल्प असल्याचे उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी सांगितले आहे.

# कर्जत न.प निवडणूकीच्या दोन नगराध्यक्ष तर ४६ नगरसेवक पदाचे उमेदवारांचे भवितव्य मतदान पेटीत बंद !

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूकीच्या एकूण १० प्रभागा करीता नगराध्यक्षा पदासाठी दोन महिला उमेदवार तर एकूण ४६ नगरसेवक पदासाठी २४ महिला व २२ पुरूष उमेदवार हे निवडणूक रिंगणात उतरले आहे. तर दि. ०२ डिसेंबर २०२५ रोजी पार पडलेल्या मतदान प्रक्रियेमधुन आज या सर्व उमेदवारांचे भवि तव्य मतदान पेटीमध्ये बंद झाले आहे.

या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये एकूण २९,९५७ मतदारांचा समावेश असुन, त्यापैकी १५०४५ पुरूष तर १४९११ महिला मतदार या आपल्या मतदानाचा हक्क बजाविणार आहे. एकूण ३३ मतदान केंद्र हे मतदानासाठी कार्यरत असुन, या कार्यरत मतदान केंद्रापैकी कोतवाल नगर परिसरातील शिशु मंदिर शाळेतील प्रभाग क्र. ३/१ या मतदान केंद्रावर ७.३० वाजता मतदान प्रक्रिया सुरू झाल्या नंतर बॅलेट युनिट मशीन बंद पडल्याची घटना घडल्याने, मात्र मतदारांना साधारण पाऊण तास रांगेत उभे राहण्याचा त्रास सहन करण्याची वेळ आली. मात्र पाऊण तासा नंतर दुसरी मशीन लावल्यानंतर मतदान हे पुन्हा सुरळीत सुरू झाले. तर दहिवली येथील मराठी शाळे मध्ये ही प्रभाग क्र. ८ मधील ८ / ३ या मतदान केंद्रावर तीन बॅलेट मशीन बंद पडल्याची घटना घडल्याने साधारण मतदारांना दीड ते तीन तास रांगेत उभे राहावे लागले आहे. तर या मतदान केंद्रावर जेष्ठ व दिव्यांग नागरिकांसाठी निवडणूक अधिकारी यांच्या कडून बसण्याची व पाण्याची तसेच विलचेअर व्यवस्था नसल्याने, मात्र होणाऱ्या गैरसोईमुळे काही जेष्ठ व दिव्यांग नागरिकांकडून निवडणूक अधिकारी यांच्या गैरव्यवस्थे बदल नाराजी दर्शवत मतदान न करता परत निघुन गेल्याची परस्थिती समोर आली आहे. त्यानंतर दोन बॅलेट मशीन या आणल्यानंतर या मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया ही पुन्हा सुरळीत सुरू झाले आहे.

# आयोगावर आक्षेपांचे ढग

राज्य निवडणूक आयोगाकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची जबाबदारी असते. या जबाबदारीच्या वहनात आयोग कमी पडत असल्याचे चित्र सध्या निर्माण झाले आहे. आयोग सत्तारूढ पक्षाच्या कलाने चालतो, हा आरोप तसा जुनाच; पण आता सरकारचे प्रमुख असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच आयोगाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

मतदानाला ४८ तास बाकी असताना काही ठिकाणी नगराध्यक्षपदासह सगळीच निवडणूक, तर अन्यत्र काही प्रभागांमधील निवडणूक पुढे ढकलण्याचा अनाकलनीय निर्णय आयोगाने घेतल्याने सत्ता पक्ष आणि विरोधी पक्षांकडूनही नाराजीचे सूर उमटत आहेत. या निर्णयामुळे गोंधळात गोंधळ अशी स्थिती निर्माण झाली आहे. उमेदवारी अर्ज केवळ ऑनलाइनच भरता येईल, असे फर्मान आयोगाने सुरुवातीला काढले. पण ऑनलाइन अर्ज भरण्यात दुर्गम भागातच नाही तर अन्य ठिकाणीही येणाऱ्या अडचणींचा आयोगाने विचारच केला नव्हता. अंतिम मुदत संपण्याच्या दोन-तीन दिवस आधी ऑफलाइन अर्ज भरण्याची मुभा देण्यात आली. अधिकाऱ्याकडे जाऊन अर्ज भरला तर शक्तिप्रदर्शनाची एक संधी उमेदवाराला मिळत असते, ती ऑनलाइनच्या हव्यासापोटी अनेकांना मिळाली नाही. ऑफलाइनची परवानगी ऐनवेळी दिल्याने शेवटच्या दिवसांत अर्ज भरण्यासाठी तोबा गर्दी उसळून गोंधळ झाला. या निवडणुकीचा प्रचार ३० नोव्हेंबरला सायंकाळी ५ वाजता संपेल, असे आयोगाने आधी जाहीर केले होते. मात्र, २८ नोव्हेंबरला जाहीर केले की, १ डिसेंबरला रात्री १० वाजेपर्यंत प्रचार करता येईल. अशी ऐनवेळी मर्यादा वाढवण्याचे काय कारण? प्रचारमर्यादेबाबत नेमका नियम काय आहे, याची आयोगाला कल्पनाच नव्हती का? आणि पूर्वकल्पना होती तर मग कालमर्यादेत वाढ का करण्यात आली? ऐनवेळी नगराध्यक्षसह अख्खी निवडणूक पुढे ढकलण्याचा निर्णय घेणे, अनेक प्रभागांची निवडणूक पुढे ढकलणे अशा निर्णयांमुळे आयोगावर संशयाचे ढग जमा झाले आहेत. आयोगामध्ये अधिकारी व्यक्ती कोण आहेत हे महत्त्वाचे नाही, पण आयोगाचे कामकाज संवैधानिक चौकटीत चालणे, प्रत्येक निर्णय हा नियमांच्या चौकटीतच घेणे अपेक्षित आहे. उमेदवारी अर्ज फेटाळले जाणे, त्यांना न्यायालयात दिलेले आव्हान, न्यायालयाने त्यावर दिलेले निर्णय हे सर्वच निवडणुकांमध्ये होत असते. पण हे असे झाले तर आयोग त्यावर काय करेल, ते तसे झाले तर आयोग काय करेल, हे निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करतानाच सार्वजनिक केले जाते. त्यामुळे प्रत्येक बाबतीत स्पष्टता असते. निवडणूक प्रक्रिया एकदा सुरू झाली की, उद्भवलेल्या प्रसंगानुसार आणि परिस्थितीनुरूप ठरवायला गेले की, विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह तर येणारच. त्यातूनच मग आयोगाच्या हेतूवर शंका उपस्थित होते. निवडणूक प्रक्रियेत ज्याचा अर्ज बाद झाला, त्याने न्यायालयात धाव घेतली. अगदी उच्च न्यायालयानेही तो अर्ज बादच ठरवला तरीही अशा वॉर्डाची निवडणूक २ डिसेंबरऐवजी २० डिसेंबरला घेण्याचे आयोगाने जाहीर केले आहे. ही निवडणूक पुढे ढकलण्याची काय गरज होती, असा प्रश्न सामान्य नागरिकांनाही पडला आहे. निवडणूक पुढे गेली अशा ठिकाणच्या उमेदवारांची डोकेदुखी वाढली. त्यांचा खर्चही वाढणार आहे. खर्चाची कायदेशीर मर्यादा आयोगाने घालून दिलेली आहे. आता प्रचाराचे १७-१८ दिवस वाढल्याने ही मर्यादा त्या उमेदवारांसाठी आयोग वाढवून देणार का? हा मुद्दाही कळीचा आहे. उमेदवारी अर्ज फेटाळताना सर्वत्र जे नियम/निकष लावून निर्णय देण्यात आले, त्यातही समानता नसल्याचे समोर आले आहे. एसडीओ वा तत्सम निर्णय अधिकारी कोण आहे, यावर उमेदवारी अर्जाचे भवितव्य न ठरता ते नियमांच्या चौकटीतच ठरायला हवे ही साधी अपेक्षा होती. तसे दिसत नसल्याने उमेदवारी अर्ज स्वीकारणे वा फेटाळणे याबाबतचे दिशानिर्देश स्पष्टपणे देण्यात आलेले नव्हते का? अशी शंकाही उपस्थित होते. एकूणच जे निर्णय झाले ते आयोगाने हेतुपुरस्सर वा राजकीय दबावाखाली घेतल्याचे आरोप होतच आहेत. एकवेळ हा आरोप निराधार असल्याचे मानले तरी त्या-त्या वेळी उपस्थित झालेल्या शंका/आक्षेपांना लगेच माध्यमांमधून उत्तरे देण्याची तसदी आयोगाने घ्यायला हवी होती. आयोग संवादात कमी पडल्याने संशयाचे ढग अधिक गडद झाले. संवादाची ही दरी निदान जिल्हा परिषद व महापालिका निवडणुकीच्या काळात तरी बुजवली जाईल, अशी अपेक्षा आहे.

# गुन्हे शाखा कक्ष ३ पनवेलकडून ४ अट्टल आरोपींना अटक ; ९ गुन्हे उघडकीस

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गुन्हे शाखा कक्ष ३ पनवेलकडून ४ अट्टल आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून ९ गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे.

पनवेल जवळील ए-टॅक इंटरप्रायझेस कंपनीच्या साईटवर उरण ते गव्हाणफाटा या रस्त्यावर गव्हाणफाटा चौकीच्या पुढे उरणकडे जाणाऱ्या रस्त्याच्या डाव्याबाजुस सुरू असलेल्या रेल्वे ब्रिजच्या बांधकाम साईटवर चार अनोळखी चोरट्यांनी बोलेरो पिकअपसह येवुन साईडवरील वॉचमनचे हात रस्सीने बांधुन त्यास मारहाण केली. तसेच सदर ठिकाणावरुन लोखंडी रेल्वे ब्रिज बनविण्याचे साहित्य व सामानाची चोरी केली. म्हणून पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस आयुक्त, नवी मुंबई मिलींद भारंबे, पोलीस सह आयुक्त, संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, सचिन गुंजाळ यांनी जबरी चोरी व घरफोडी चोरीतील गुन्हयांना प्रतिबंध करणेकामी व घडलेले गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे सपोआ, गुन्हे शाखा, अजयकुमार लांडगे यांचे पर्यवेक्षणाखाली गुन्हे शाखा कक्ष ३, पनवेल यांचे विशेष पथक स्थापन करण्यात आले. यामध्ये गुन्हे शाखा, कक्ष ३ पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अविनाश काळदाते यांचे नेतृत्वाखाली सपोनि पवन नांद्रे, पोउपनि अभयसिंह शिंदे, माधव इंगळे, सफौ अनिल पाटील, पोहवा रमेश शिंदे, प्रमोद राजपुत, अजित पाटील, निलेश पाटील, रूपेश पाटील, इंद्रजित कानु, दिपक डोंगरे, सागर रसाळ, मपोहवा हिरकणी पाटील, पोना अजिनाथ फुंदे, पोशि लवकुश शिंगाडे, प्रसाद घरत, विकांत माळी आदींच्या पथकाने तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या आधारे बेलापुर येथुन आरोपी समशेर शेर खान, वय २१ वर्षे, सध्या रा. दिवाळे गाव व कुलदिप बच्चु सिंग, वय २३ वर्षे, रा. सेक्टर १४, सीबीडी. नवी मुंबई यांना ताब्यात घेतले. त्याचेकडे कौशल्यपुर्ण तपास करता त्यांनी सदर गुन्हा केल्याची कबुली दिली. तसेच पनवेल शहर, कामोठे तसेच उलवा पोलीस ठाणे हद्दीतुन बिल्डींग बांधकामाकरीता वापरण्यात येणारे स्टिल व इतर साहित्य चोरीचे गुन्हे केल्याचे सांगितले. कुलदीप सिंग या आरोपीचा सक्रिय सहभाग आढल्याने त्यांना अटक करण्यात आली आहे.

नमुद दोन आरोपींकडे केलेल्या कौशल्यपुर्ण तपासात कळंबोली पोलीस ठाणे, श्री गुरूनाथ शनमुखअप्पा नरशेट्टी, वय ६४ वर्षे, रा. प्लॉट नंबर १२, सेक्टर १४, कळंबोली हे त्यांचे पत्नीसह बेंगलोर येथे गेले असताना कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी घराचे मुख्य दरवाज्याचे लॉक तोडुन त्यावाटे घरात प्रवेश करून घरातील बेडरूम मधील कपाटात ठेवलेले सोन्याचांदीचे दागिने व रोख रक्कम घरफोडी चोरी केल्याने कळंबोली पोलीस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हा नोंद आहे. सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी विशेष पथकाने कळंबोली, पनवेल, तळोजा परिसरातील सीसीटिव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासून तसेच तांत्रिक तपासाव्दारे सदरचा गुन्हा हा आरोपी सलिम मोहम्मद शेख, वय ३७ वर्षे, रा. दापोली व तौफिक मोहम्मद शेख, वय ३२ वर्षे, रा.चिकोडी, आरोपींनी केल्याचे निष्पन्न केले. मिळालेल्या गुप्तबातमीप्रमाणे वर नमुद आरोपींना महात्मा फुले नगर, अंबरनाथ येथुन ताब्यात घेण्यात घेतले. नमुद दोन आरोपींकडे केलेल्या कौशल्यपुर्ण तपासात पुढील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहेत. नमुद आरोपींकडुन गुन्हयातील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून सध्या ते तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे न्यायालयीन कोठडीत आहेत. यासह पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ४ गुन्हे व कामोठे १ व उलवा १ येथील गुन्हे उघडकीस करण्यात पोलिसांना यश आले आहे.

# सदनिका खरेदीत ७ कोटी २९ हजार ५७८ रुपयांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर परिसरात सदनिका खरेदीच्या आमिषाने तब्बल ७ कोटी २९ हजार ५७८ रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार १६ वर्षांनी उघड झाला आहे. याप्रकरणी बांधकाम कंपनीच्या मालकांवर खारघर पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी हे ५१ वर्षीय व्यक्ती असून इतर ८ खरेदीदारांनी २००९ पासून रोहिंजण येथील प्रकल्पातील सदनिका खरेदीसाठी एकूण ७ कोटी २९ लाख ५७८ रुपये कंपनीच्या खात्यात अदा केले. मात्र संबंधित कंपनीच्या मालकांनी खरेदीदारांना सदनिका न देता फसवणूक केल्याचे तक्रारीत नमूद आहे.गुंतवणूकदारांनी वारंवार मागणी करूनही सदनिका किंवा रक्कम न मिळाल्याने पोलिसांकडे धाव घेतली.

# वरसगांव-भिरा मार्गावर होणाऱ्या अपघाताला जबाबदार कोण? : विश्वास बागुल

**दै.रायगड नगरी । कोलाड**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरून जाण्यासाठी वरसगांव ते भिरा फाटा आहे.परंतु हा महामार्ग ओलांडण्यासाठी अंडरपास रस्ता नाही.काही ठिकाणी अगदी छोट्या गावासाठी अंडरपास रस्ता बांधण्यात आले आहेत.परंतु सतत वर्दळ असणाऱ्या मुरुड ते पुणे राज्यमार्गावरील वरसगांव फाट्यावर अंडरपास रस्ता का बांधला नाही यामुळे भविष्यात होणाऱ्या दुर्घटनेला जबाबदार कोण? अशी संतप्त प्रतिक्रिया कुणबी समाजाचे युवा नेते विश्वास बागुल यांनी व्यक्त केली आहे.

मुंबई-गोवा महामार्गाचे काम गेली १८ वर्षांपासून सुरु आहे.परंतु रक ना धड भारभर चिंध्या असेच आहे. आंबेवाडी बाजारपेठेतील उड्डाण पुलाचे काम सुरु असुन ते वरसगांव-भिरा फाट्याच्या पुढे व्हायला पाहिजे होते. परंतु ते अर्धवट स्थितीत होणार असल्याचे संकेत मिळत आहे.कारण या फाट्यावर अंडरपास रस्ता ठेवला नाही यामुळे वरसगांव-भिरा फाट्यावरून येजा करणाऱ्या वाहन चालकांसहित प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण होणार आहे.

तसेच वरसगांव-भिरा या मार्गांवर विले भागड येथे पोस्को स्टील कंपनी असुन या मार्गावर स्टील वाहतूक करणारे ट्रेलर मोठ्या प्रमाणात येजा करीत असतात.या ट्रेलरचा वारंवार अपघात होत आहेत. यामुळे या मार्गांवरून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे.परंतु याची दखल लोकप्रतिनिधीकडून का घेतली जात नाही यासंदर्भात आश्चर्यच व्यक्त करण्यात येत आहे कारण यांच्या पाठी पुढे पोलिसांच्या गाड्या असल्यामुळे त्यांचा प्रवास सुखकर होतो.पण सर्वसामान्य प्रवाश्यांचे काय?असा सवाल कुणबी युवा नेते विश्वास बागुल यांनी पत्रकारांशी बोलातांना व्यक्त केले.

### पाटोळे परिवाराचा अनोखा उपक्रम....

# गरजू रुग्णांसाठी 'औषधदान' करून समाजमन जिंकले

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगाव तालुक्यातील दानशूर आणि कष्टाळू पाटोळे परिवाराने पुन्हा एकदा समाजाप्रती असलेली आपुलकी, ममत्व आणि जिव्हाळा सिद्ध केला आहे. गरजू रुग्णांसाठी सदैव तत्पर असणाऱ्या या कुटुंबाकडून उपजिल्हा रुग्णालय, माणगाव येथे जीवनावश्यक औषधसामुग्रीचा मोठ्या प्रमाणात पुरवठा करण्यात आला.



आपल्या आई-वडिलांच्या वाढदिवसानिमित्त कुटुंबाने १००० सलाईन बॉटल्स, ४५० इंजेक्शन्स, २०० आय.व्ही. सेट्स अशी अनमोल देणगी देत समाजासाठी नवा आदर्श निर्माण केला. कष्ट, मेहनत आणि प्रामाणिकपणाच्या बळावर उभ्या राहिलेल्या दशरथ पाटोळे व सौ. दर्शना पाटोळे या दांपत्यांनी आपल्या मुलांना उच्चशिक्षित करून सक्षम बनवले. त्यांच्या सहानुभूतीची, समाजकार्यातील निष्ठेची शिकवण दोन्ही मुलांच्या रगारगात भरली आहे.

आई-वडिलांविषयी आदर, समाजाबद्दल संवेदनशीलता आणि गरजूंवरील ममत्व या मूल्यांवर वाढलेल्या या दोन्ही बंधूंनी दानधर्माचा अनोखा मार्ग निवडून पालकांना खऱ्या अर्थाने वाढदिवसाची अनमोल भेट दिली. या सदिच्छा दानासाठी सामाजिक कार्यकर्ते संतोष खाडे यांनी दिलेली प्रेरणा म्हणजे पाटोळे परिवाराच्या सामाजिक प्रवासाला मिळालेले महत्त्वाचे बळ ठरले.

दान केलेली औषधे कर्तव्यदक्ष अधीक्षक डॉ. अरुणा पोहरे यांच्या ताब्यात देण्यात आली. यावेळी हॉस्पिटल कर्मचारी अनिल तेटगुरे, रुपेश पाटोळे, तेजस पवार तसेच संतोष- संगीता सिताराम खाडे उपस्थित होते. रुग्णालयात या उपक्रमाचे मनापासून स्वागत करण्यात आले. मेहनत, कष्ट, प्रामाणिकता आणि कौटुंबिक एकता ही पाटोळे कुटुंबाची खरी ताकद. समाजाप्रती असणारी संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी आज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# ५८ दुर्गवीरांसोबत सुरगड श्रमदान मोहीम मोठ्या उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब**

दुर्गवीर प्रतिष्ठान मुंबई आयोजित सुरगड संवर्धन श्रमदान मोहीम नुकतीच मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आली.

या मोहिमेसाठी रत्नागिरी, चिपळूण, खेड, माणगाव, रोहा,पुणे,मुंबई व स्थानिक अश्या ५८ दुर्गवीरांनी सहभाग नोंदवला होता.गडावरील दारुकोठार, राजसदार, टाकं व वेगवेगळी जोतींवरील वाढलेलं गवत काढून त्यांना उजेडात आणण्याचं काम सदर मोहिमेत करण्यात आले. तसेच गडाच्या पूर्वेला मातीखाली गाडलेलं एक नवीन पाण्याचं टाकं सापडल्यानं त्याचं गाळ, माती काढण्याचं काम करण्यात आले. या मोहिमेत ३ वर्षापासून ते ५०वर्षापर्यंत अशा सर्व वयोगटातील दुर्गवीर सहभागी झाले होते. सर्वांच ओळख सत्र करून गडसंवर्धनास सुरुवात केली नंतर गडसंवर्धनाचे महत्व पटवून आपली संस्कृती व इतिहास टिकवण्यासाठी अशा अनेक हातांची गरज आहे असे आवाहन सर्वांना करण्यात आले, संपूर्ण गडफेरी करून मोहिमेचा शेवट करण्यात आले.

दुर्गवीर प्रतिष्ठान संस्था ही अध्यक्ष संतोष हासुरकर यांच्या अध्यक्षतेखाली गेलं अनेक वर्षे महाराष्ट्रात अपरिचित असलेल्या गडकिल्ल्यांचे संवर्धन करण्याचं काम करत आहेत.

किशोर सावरकर, स्थानिक दुर्गवीर यांनी सांगितले की, रोहा तालुक्यातील खांब पंचक्रोशीतील वैजनाथ घेरास-ुरगड गावाजवळ असलेल्या सुरगडावर स्थानिक दुर्गवीर किशोर अर्जुन सावरकर , किरण गायकर आणि नेहा चव्हाण,अर्जून दळवी यांच्या नेतृत्वाखाली संवर्धनाचे कार्य करताना दिसत आहेत.तर अनेक जिल्ह्यातून मोठ्या संख्येने दुर्गवीर ठिकठिकाणी गडदुर्गांचे संवर्धन करताना दिसत आहेत.

# देह माझे भजन, तर शास्त्रीय संगीत माझा आत्मा : पं. उमेश चौधरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दत्तजयंतीनिमित्त आयोजित भक्तिमय कार्यक्रमात प्रसिद्ध संगीतकार व गायक पं. उमेश चौधरी यांनी आपल्या सुमधूर गायनाने उपस्थितांचे मन मोहून टाकले. या प्रसंगी बोलताना त्यांनी, देह माझे भजन, तर शास्त्रीय संगीत माझा आत्मा असे मनोवेधक प्रतिपादन केले.




सदगुरु वामनबाबा महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या तळोजे मजकूर योगीनगर (धोंडळी) परिसरात दरवर्षीप्रमाणे भक्तिभाव आणि अध्यात्मिक उत्साहात 'श्री गुरुचरित्र पारायण सोहळा व श्री दत्तजयंती उत्सव' आयोजित करण्यात आला. श्री नवनाथ सेवा मंडळ, योगीनगर (धोंडळी) यांच्या वतीने आयोजित हा उत्सव स्थानिक भक्तांसह संपूर्ण परिसरातील भाविकांसाठी अतिशय महत्त्वपूर्ण मानला जातो.मुख्य आकर्षण म्हणून सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. उमेश चौधरी यांचे शास्त्रीय गायन व अभंगवाणी सादर झाली. कार्यक्रमाच्या सुरुवातीपासूनच प्रांगणात भक्तीभाव आणि संगीतरसिकांच्या उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. पं. उमेश चौधरी यांनी विविध रचना सादर करत रसिकांना अद्वितीय संगीत अनुभव दिला. त्यांच्या सुमधुर गायनाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दत्तजयंतीच्या शुभवेलीत आयोजिलेला हा कार्यक्रम आध्यात्मिक उन्नती आणि संगीतसाधनेचा सुंदर संगम ठरला. विशेष म्हणजे या कार्यक्रमाला महंत यशवंत महाराज यांची आशिर्वादपर प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनीही उपस्थिती दर्शविली.

पं. उमेश चौधरी यांच्या सुमधुर गायनाला अक्षय चौधरी आणि मंगेश चौधरी यांनी संगीत साथ दिली. तबल्यावर सुप्रसिद्ध तबलावादक प्रसाद पाध्ये, पखवाजावर ॲड. सूरज गोंधळी, हार्मोनियमवर सुप्रिया जोशी तर टाळ वाद्यावर गुरुदास कदम या अनुभवी कलाकारांची उत्तम साथ लाभली. सूत्रसंचालन व निवेदनाची जबाबदारी सोपान आडव यांनी प्रभावीपणे पार पाडली. पं. उमेश चौधरी यांनी गायनाची सुरुवात जयजयवंती रागातील बडा खयाल 'ए माई ऐसे समेमे' ने केली. त्यानंतर त्याच रागातील 'मोरे मंदर अजहूनही आये' हा छोटा खयाल सादर केला. पुढे 'श्रीरामचंद्र कृपाळू भजु मन' ही गोस्वामी तुलसीदासांनी रचलेली प्रसिद्ध रामस्तुती अभंगवाणी सादर केली. यानंतर 'चंदनाची परिमळ', 'याहूनी मागणे काय दत्ता', 'नाचतो तव भजनी', 'हरी म्हणा तुम्ही गोविंद म्हणा' हे अभंग सादर झाले आणि 'स्वामी कृपा कधी करणार' या भैरवी रचनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

# चिरनेर, कातळपाडा हरीनाम साप्ताहा निमित्त दिपोत्सव

**दै.रायगड नगरी । उरण**

हरिभक्ती हे भगवंतापर्यंत जाण्याचे साधन असून, प्रत्येकाने भगवंताचे नामस्मरण केल्याशिवाय फळप्राप्ती होत नाही. सोन्याला शुद्ध होण्यासाठी आगीतून जावे लागते तसेच भगवंताची भक्ती होत असताना अनेक अडथळे येत असतात. मात्र भगवंताच्या नामस्मरणाने फळप्राप्ती होते, असा उपदेश ह. भ. प. अनिल महाराज-वशेणी यांनी काल्याच्या कीर्तनातून केला.

चिरनेर कातळपाडा येथे दत्त जयंती उत्सव सोहळा निमित्ताने सद्गुरु माऊली हसुरमबाबा यांच्या कृपाशीर्वादाने आणि संतांच्या चिंतनाने तसेच गुरुकुलच्या सहकार्याने हभप गजानन महाराज, ह भ प चिदानंद महाराज, ह भ प मदन महाराज आणि दात्यांच्या सहकार्याने व्यासपीठ चालक गुरुवर्य ह भ प अनिल महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली गेले सात दिवस अखंड हरिनाम सप्ताहात ग्रंथ दिंडी ,गुरुपूजन, विणा पूजन, प्रतिमा पूजन, दीप प्रज्वलन, ग्रंथ पूजन, कलश पूजन, व्यासपीठ पूजन व श्री गुरुचरित्र ग्रंथ पारायण वाचन असे विविध धार्मिक कार्यक्रम पार पाडण्यात आले. दरवर्षीप्रमाणे सप्ताहाच्या सातव्या दिवशी दीपोत्सवाच्या माध्यमातून सप्ताहाची सांगता करण्यात आली. या अखंड हरिनाम सप्ताहात भजन, कीर्तन आणि प्रवचनाच्या माध्यमातून या ठिकाणी चैतन्य निर्माण झाले होते. नामवंत कीर्तनकारांच्या व प्रवचनकारांच्या मुखातून निघणाऱ्या अमृतवाणीने अनेकांची मने भारावून गेली होती. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व राजकीय अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांनी व वारकऱ्यांनी तसेच थोर कीर्तनकारांनी दीप प्रज्वलित करून दीपोत्सव साजरा केला.


## पनवेल महानगरपालिका
### पर्यावरण विभाग
### जाहीर सूचना

पनवेल महानगरपालिकेमार्फत नोंदणीकृत व अनुभव संस्थांकडून Installation of off-grid solar benches at various places in Panvel Municipal Corporation area and maintenance for 1 year. याकामासाठी आर्थिक खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणेकरिता बाजारभावाची दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

जा.क्र/पमपा/पर्यावरण/२८२५/प्र.क्र.२५/३२८/२०२५

दिनांक : ०२/१२/२०२५

(सही/-)
उपायुक्त (पर्यावरण)
पनवेल महानगरपालिका


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# दैनिक रायगड नगरी

**बातम्या व जाहिरातींचे उत्तम माध्यम**

**संपर्क : ९६१९९७९७०६ / ९६१९७३७९११**


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. प्रदीप राजाराम इनामदार, रा : फ्लॅट नं. १०२, पहिला मजला, सदगूरू सोसायटी, प्लॉट नं २०, सेक्टर १९, खारघर, नवी मुंबई - ४१०२१०, यांची खालील वर्णनाची मिळकत स्वताच्या मालकिची आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**

**फ्लॅट नं. १०२, पहिला मजला, सदगूरू सोसायटी, प्लॉट नं २०, सेक्टर १९, खारघर, नवी मुंबई - ४१०२१०**

त्यानंतर वरील मिळकतीचे सर्व मुळ कागद पत्रे आमच्या अशिलाच्या ताब्यात होते. आमचे अशिल सदर मिळकतीचे कायदेशीर मालक आहेत. सदर मिळकतीचे खालील कागदपत्रे आमचे अशिल यांच्या कडुन गहाळ झाले आहेत. (१) Original Transfer Letter no. CIDCO/EMS/AEO(HQ)2005/722 dated. 27-04-2005, issued by CIDCO,

त्याबाबत आमच्या अशिलांनी खारघर पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली आहे, त्याचा नं. १८४३/२०२५ दि.०२/१२/२०२५ असा आहे. त्यानंतर वरील मिळकत आमचे अशिल विकत आहेत.

तरी याबाबत कोणाहि व्यक्तीस कागदपत्रे आढळल्यास खालील पत्यावर कागदपत्रा सहित १४ दिवसाच्या आत समक्ष भेटावे.

ठिकाण : खारघर
दि.२/१२/२०२५

**सही/-**
**ॲड.यश प्रभाकर बांगर**
**शॉप क्र. ०४, समनवय को. ऑप. सो, प्लॉट क्र.१३, सेक्टर क्र.११, खारघर -४१०२१०**
**मो.नं. ८८९८६५१६४४/८९२८५५६४०१**

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या नोटीसीद्वारे जाहिर सुचना देण्यात येते की, श्रीमती शितल अभय केणी राहणार मु चिंचपाडा (वडघर), ता. पनवेल, जि. रायगड यांचे पती श्री अभय केणी यांना सिडको लि, कडून मौजे नोड पुष्पक वहाळ, येथील फाईल नं CHIV-ICOGD-2 (पुष्पक वहाळ) प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भुखंडांचे वाटप झालेले आहे. सदर भुखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादित घराच्या जमिनीच्या मोबदल्यात पूनवर्सन व पूनस्थापना योजने अंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबई, कडून खालीलप्रमाणे पात्रता मंजुर होऊन करारनामा झाला आहे अभय विलास केणी यांनी बक्षीसपत्र नोदणीकृत केले असून श्रीमती शितल अभय केणी यांच्याकडून माझे अशिल मे परशुराम ग्रुप तर्फे भागीदार १. श्री सुरज पंढरीनाथ केणी २. श्री किरण पंढरीनाथ केणी ३. श्री संकेत परशुराम केणी यांनी खाली वर्णन केलेला भूखंड विकसीत करारनामा व त्रिपक्षीय करारनामा / हस्तांतरण करण्याचे, तसेच भूखंड विकसीत करण्याकरिता विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**

**सिडको फाईल क्रमांक** CHIV-ICOGD-2 (पुष्पक वहाळ)

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक वहाळ | २५ ए | ४९१ एफ | ३२० चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकती मध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी त्यानंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सुचना प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

दि.०२/१२/२०२५

**सही/-**
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**शॉप नं.४५, पहिला मजला, क्रिस्टल प्लाझा, सेक्टर ७, खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

मा.पवार मॅडम कोर्ट
ॲड.सुजाता पाटील ८८७९४१६४८३

## जाहीर नोटीस

मे. पनवेल येथील दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) यांचे न्यायालयात
दिवाणी चौकशी अर्ज क्र.१४२०/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.२०/०१/२०२६

श्रीमती माधवी मनोहर सावंत व इतर दोन — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

वरील अर्जदार नं १ यांचे पती ते अर्जदार नं २ व यांचे वडील कै. श्री मनोहर तुकाराम सावंत ते दिनांक १७.१२.२०२४ रोजी जे जे हॉस्पिटल, बृहन्मुंबई, मुंबई, महाराष्ट्र येथे निधन झाले असून अर्जदार १. श्रीमती माधवी मनोहर सावंत राहणारः एम-३ : ११, स्पेगेटी, सेक्टर १५, खारघर, रायगड, महाराष्ट्र, ४१०२१०, २. श्री. प्रतीक मनोहर सावंत राहणार : तपोवन, ए/२०६, सेनापति बापट मार्ग, लोवर परेल, डेलीईरोड रोड, मुंबई, महाराष्ट्र ४०००१३ ३. सौ सायली मनोज परब राहणार : इमारत क्र. ३८, रूम नं. २७२३, एम एच बी कॉलनी, जी डी आंबेडकर मार्ग, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई, महाराष्ट्र, ४०००३३. हयानी वारस म्हणून वारसाचा वारसदाखला मिळणे बाबत मे. न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत कै. श्री मनोहर तुकाराम सावंत यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मालमत्ता परिशिष्ट**
**कै. श्री मनोहर तुकाराम सावंत (१०० टक्के भाग)**
**एम-३:११, तिसरा मजला, स्पेगेटी, प्लॉट नं. २२, सेक्टर १५, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड, महाराष्ट्र, ४१०२१०**
**क्षेत्र : ४९.८१ चौ.मी.**
**मालमत्ता मूल्यांकन : रूपये ५,३५,९५६/-**
**(अक्षरी पाच लाख पस्तीस हजार नऊशे छप्पन मात्र)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत मे न्यायालयात अर्ज केलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी वरील पध्दतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारच्या विनतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक २७/११/२५ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## सार्वजनिक सूचना

तमाम जनतेस याद्वारे नोटीस दिली जात आहे की माझे पक्षकार श्री. गुलाब याकूब मुलांनी, वय वर्ष ५४, याची मालमत्ता रो. हाऊस नंबर. ११, न्यूव पंचवटी को. ऑप हौसिंग सोसायटी लिमिटेड, प्लॉट नंबर-बी-३, सेक्टर-१५, कळंबोली तालुका- पनवेल, जिल्हा-रायगड नवी मुबई महाराष्ट्र पिन नंबर-४१०२१८, एकूण क्षेत्रफळ ३२.०० sq. मीटर बिल्टअप मात्र, ही मालमत्ता याना हि मालमत्ता सिडको कडून लॉटरी मार्फत मिळालेली आहे हा रो. हाऊस, सेल हा रो हौस श्री. मोहम्मद झुबेर याकूब अनसरी व श्रीमती. सहीस्था मोहम्मद झुबेर अनसरी याना विकलेली आहे,

जर या मालमतेच्या संदर्भात कोणालाही म्हणजेच तमाम जनतेस असे सूचित करतो की जर हा, जर या मालमतेच्या प्रकरणी कोणाचे काहीही तक्रार किंवा देवाण घेवाण असेल तर मला त्याची माहिती देण्यात यावी, ऑफिस पत्ता के एल-१, ई ११, सेक्टर-५ई कळंबोली तालुका पनवेल, जिल्हा-रायगड नवी मुंबई महाराष्ट्र पिन. नंबर-४१०२१८., या पत्यावर (७) दिवसाच्या आत देण्यात यावे, जर या मालमतेच्या प्रकरणी कोणाचे काहीही तक्रार किंवा देवाण घेवाण असेल तर मला त्याची माहिती देण्यात यावी अन्यथा सात (७) दिवसाच्या नंतर कोणाचेही काही ऐकले जाणार नाही, व ग्रहीय धरले जाणार नाही हि आपणास सूचना देत आहे धन्यवाद

कळंबोली
मोबाईल क्र.९८१९०७७३८६/९१२५३००९९९

**सही/-**
**ॲड.राकेश ब्रह्मदेव गायकवाड**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**

खंडारे सो.कोर्ट
ॲड.रोशनी सु. ठाकूर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश व स्तर यांचे कोर्टात
दिवाणी चौकशी अर्ज क्र.९५४/२०२५
नि.नं.७/ड

श्री.प्रणव विकास पाटील व इतर — अर्जदार

सदर जाहीर नोटीशीद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते की कै. रचना प्रणव पाटील, रा. फ्लॅट नं.२१०, ८५ सुर्यकीर्ती टॉवर, सी विंग, रोड नं. १३, साईबाबा मंदीर जवळ, टिळक नगर, मुंबई ४०००८९ यांचे दिनांक २३/११/२०२३ रोजी निधन झाले. आहे. अर्जदार १. श्री. प्रणव विकास पाटील २. कु. श्लोक प्रणव पाटील व ३. कु. स्वर प्रणव पाटील रा. रा. फ्लॅट नं. २१०, ८५ सुर्यकीर्ती टॉवर, सी विंग, रोड नं. १३, साई बाबा मंदीर जवळ, टिळक नगर, मुंबई ४०००८९ यांनी त्यांचे नावे वारस दाखला मिळणेकरीता मे. दिवाणी न्यायालय, वरीष्ठ स्तर, पनवेल यांचे कोर्टात चौकशी अर्ज क्र. ९५४/२०२५ हा अर्ज दाखल केला आहे.

कै. रचना प्रणव पाटील यांचे मृत्युसमयी त्यांचे नावे व मालकी ताबेकब्जात असलेली खालील वर्णनाची मिळकत होती.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.नं. | शॉप नं. | इमारतीचे नाव | मजला | क्षेत्र चौ.मी. | क्षेत्र चौ.फुट |
|---|---|---|---|---|---|
| २ | शॉप नं.०३ | रिद्धी सिद्धी घरोंदा को.ऑ. हौ.सो.लि. | तळ मजला | २०.४१ | २१९.६९ |

सदर चौकशी अर्जास कोणाचीही हरकत, हक्क व अधिकार असेल त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाले पासून एक महिन्याचे आत किंवा दि.२३/१२/२०२५ रोजी सकाळी १०.३० वा. मे. दिवाणी न्यायाधिश व स्तर पनवेल यांचे न्यायालयात आपल्या हरकती योग्य त्या पुराव्यासह सादर करव्यात. सदर नोटीस प्रसिद्ध झाले पासून योग्य त्या मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास, कोणाचीही हरकत नाही असे समजून सदरील कोर्ट अर्जदार यांस वारस दाखला देईल याची नोंद घेण्यात यावी.

आज दि.२९/११/२०२४ रोजी आमचे सहीने मे. कोर्टाच्या शिक्क्यासह दिले.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे शिरढोण, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तिंच्या मालकी हक्काची, ताबेकब्जा, वहिवाटीतील तसेच त्यांचे नावे सातबारा सदरी नोंद असलेली मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त नोंदणीपूर्वी सदर मिळकतीमधील मूळ मालक यांचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : शिरढोण, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| भोगवटादाराचे नांव | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| बामी उर्फ सुनिता दत्तात्रेय पाटील यांचे मालकीचे संपूर्ण क्षेत्र | १२२/२ | ०-७२-८० पो.ख.०-०८-१० एकूण क्षेत्र ०-८०-९० | ९.५० |
| | | ०-३६-४० पो.ख. ०-०४-०५ एकूण क्षेत्र ०-४०-४५ | ४.७५ |

सदरहू जागा, जमिन व सदर मिळकतीसंबंधी अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी हक्क, कुळ हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष, तोंडी तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हितसंबंध हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.०२/१२/२०२५

**सही/-**
**ॲड.शेखर ज. खोपकर**
**९८ पहिला मजला, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६**

# माथेरान मध्ये पार पडले शांततेत मतदान

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये पार पडलेल्या निवडणुका मोठ्या उत्साहात व शांततेत पार पडली,तब्बल ९ वर्षानंतर माथेरान कर निवडणुकीस सामोरे गेले होते व या वेळी प्रथम मतदान करणारी तरुणाई ची ताकद या निवडणुकीमध्ये दिसणार असून या अनेक प्रस्थापितांना या निवडणुकीमध्ये धक्का बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सकाळी साडे सात वाजल्यापासून माथेरान मध्ये निवडणुकीस सुरवात झाली होती व यावेळी १० प्रभागांकरिता १० बूथ असल्याने कोठी ही गर्दी दिसून येत न्हवती एकूण ४०५५ मतदार संख्या असल्याने मतदान शांतपणे सुरू होते व इतके दिवस एकमेकांविरोधात लढलेल्या उमेदवारांचे बूथ बाजूला असल्याने प्रक्रिया ही खेळीमेळीत पार पडली,संध्याकाळी ५:३० वाजता मतदान बंद करण्यात आले.

प्रभाग क्र १ व २ का वोटिंग मशीन मध्ये थोड्यावेळ करता बिघाड झाला होता पण त्याचा मतदान प्रक्रियेत कोणताही फरक पडला नाही कारण तो तातडीने दुरुस्त करून मतदान प्रक्रिया पुन्हा सुरू करण्यात आली.

माथेरान पोलीस ठाणे हद्दीत माथेरान नगरपरिषद निवडणूक २०२५ अनुषंगाने आज सकाळी १०:१५ वाजेच्या सुमारास प्रकाश राजेंद्र गुप्ता वय ४० रा. हॉटेल बाईक माथेरान (मूळ रा.इस्लामपूर ता. जी. झुंझुनू राजस्थान )कर्मचारी (food incharge)हॉटेल बाईक हा Lake view हॉटेल माथेरान जवळ पिशवी मध्ये रक्कम घेऊन जात आहे अशी माहिती मिळाली सदर ठिकाणी पोलीस स्टाफ व ऋडढ पथक पाठवुन त्याचे जवळील ऋडढ पथकाने पिशवीची पाहणी केली असता त्यामध्ये ५ लाख रोख रक्कम मिळून आली आहे, सदर बाबत विचारपूस केली असता त्यांनी असे सांगितले द बाईक हॉटेल चे पार्टनर रोहित डोहीफोडे यांना कर्मचाऱ्यांचे पगार देण्याकरिता पैसे घेऊन जात होतो. सदर बाबत ऋडढ पथक व्हिडिओग्राफी मध्ये पंचनामा कारवाई करून पुढील कारवाई सुरु आहे.



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यांत येते की, मौजे वरवणे, तालुका-पेण, जिल्हा-रायगड येथील खालील व्यक्तीचे मालकीची व ताबेकब्जातील खालील वर्णनाच्या जमिन मिळकती आमचे अशिलांनी कायम स्वरूपात खरेदी करुन घेण्याचा विचार केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वरवणे, तालुका : पेण, जिल्हा : रायगड**

| मालकाचे नाव | सर्व्हे व हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| श्री. मदन जयराम ठाकुर<br>श्री. मनेश जयराम ठाकुर<br>श्रीमती. सुनिता राजन ठाकुर<br>श्री. रितेश राजन ठाकुर<br>श्री. आदर्श राजन ठाकुर | १०८/अ | जिरायत ००-२४-६०<br>वरकस ००-०१-००<br>पो.ख. ००-१२-२०<br>एकूण क्षेत्र ००-३७-८० | २.५६ |

सबब वर नमूद शेतजमिन मिळकतीवर किंवा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, लाज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे.

वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर जमिन मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०२/१२/२०२५

**सही/-**
**ॲड.प्रसाद वाकडीकर**
**फ्लॅट नं. ००१, श्री साईप्रसाद को.ऑप. हौ. सो., सारस्वत बँक जवल, प्लॉट नं. ९८/२, स्वामी नित्यानंद रोड, ठाणा नाका, पनवेल, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, पिन - ४१०२०६.**
**मो. ९९२०१०४०११,**

अर्जदाराचे वकील : ॲड. दिपाली हरेश्वर परदेशी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दिवाणी चौकशी अर्ज क्र.१५४१/२०२५
नि.नं.७/ड
ने. ता. १२/०१/२०२६

१) वंदना अरुण डावलेकर
वय - ४८ वर्ष, व्यवसाय-गृहीणी
रा. ५६६, भिंगारी, पोस्ट-ओएनजीसी,
ता. पनवेल, जि. रायगड
२) अमित अरुण डावलेकर
वय - २५ वर्ष, व्यवसाय - नोकरी
रा. ५६६, भिंगारी, पोस्ट-ओएनजीसी,
ता. पनवेल, जि. रायगड
३) जतिन अरुण डावलेकर
वय - २२ वर्ष, व्यवसाय - नोकरी
रा. ५६६, भिंगारी, पोस्ट-ओएनजीसी,
ता. पनवेल, जि. रायगड — अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीव्दारे कळविण्यात येत आहे की, अर्जदार क्र. १ ह्या मयत अरुण नारायण डावलेकर यांची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हे मयत अरुण नारायण डावलेकर यांची अपत्ये आहेत. मयत अरुण नारायण डावलेकर दिनांक २९/०८/२०२५ या दिवशी मयत झालेले असून ते महावितरण कंपनीमध्ये (तत्कालीन म. रा. वि. मंडळामध्ये) दिनांक १६/०९/१९९४ या दिवशी सेवेत रुजू झाले (भ. नि. नि. क्र. ०२१०३६८१) असून ते पनवेल शहर विभागांतर्गत टपाल नाका, पनवेल शाखेत (पनवेल शहर उपविभाग) येथे वरिष्ठ तंत्रज्ञ या पदावर कार्यरत असताना दिनांक २९/०८/२०२५ या दिवशी त्यांचे निधन झाले आहे. त्यांच्या मृत्यु पश्चात मयत कर्मचाऱ्यांच्या अवलंबीत वारसाला महावितरण कंपनीत अनुकंपा तत्वावर नोकरी व इतर लाभ हे अर्जदार यांस मिळावेत याबाबत अर्जदार यांनी महावितरण कार्यालयात चौकशी केली असता अर्जदार यांस मयत अरुण नारायण डावलेकर यांचे वारस असल्याबाबत दिवाणी न्यायालयाकडून वारस दाखला सादर करण्यास सांगितल्याने अर्जदारांनी मे. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे मयत अरुण नारायण डावलेकर यांचे वारस नाहीत अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही, असे गृहीत धरुन मे. न्यायालय अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि. २/१२/२०२५ या दिवशी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे दुंदरे, ता. पनवेल, जि, रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या मिळकतीचे सर्व हक्क आमचे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन व विदयमान कब्जेदारांची नावे खालीलप्रमाणे

**मौजे दुंदरे, ता. पनवेल, जि, रायगड.**

| भोगवटादाराचे नाव / हिस्सेदार | गट/सर्व्हे भूमापन नं. | हिस्सा/ उपविभाग नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| श्री.दिलीपकुमार फतेहलाल खरोदिया | ११ | ६ | ०-१६-०० ला.ला. | ०.२८ |
| | | पो.ख. | ०-०१-०० | |
| | | एकूण | ०-१७-०० एकूण संपूर्ण क्षेत्राचे कायम स्वरुपी विक्री व हस्तांतरणाचा व्यवहार | |

वरील वर्णन केलेल्या मिळकतीचे सर्व हक्क आमचे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे.

वरील मिळकतीबाबत अन्य कोणाचाही दान, गहाण, बोजा, बक्षिस, साठेकरार, विकसनकरार, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, फरोक्त, ट्रस्टी, पोटगी, वारसा भाडेपट्टा, वहिवाट व तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासाहित सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित आहे, असे समजण्यात येऊन सदरहू मिळकती संदर्भात आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. सदर दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि.०२/१२/२०२५

**सही/-**
**ॲड.सतिश बाळाराम गवते**
**ऑफिस नं. ६४, तळमजला, सेक्टर-१, महालक्ष्मी शॉपिंग सेंटर, महालक्ष्मी नगर, मु. पो. नेरे, ता. पनवेल, जि. रायगड, महाराष्ट्र ४१० २०६**
**फोन नं. ९१३७५००४५१**

Pawar Madam
Adv.Yash P. Bangar

PUBLIC NOTICE
IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D) PAWAR MADAM COURT AT PANVEL

M.A.No.1465/2025
Exh No.7/D
N.D. 27/01/2025

1. MRS. REKHA FRANCIS BRITTO
(Nee REKHA CHANDRAKANT NIKALJE)
Age: 43 years, Occ: Service,
R/at: 704, Neelsidhi Arcade, Krupa CHSL.,
Plot No. EA1, Sector 12, Kharghar
Navi Mumbai - 410 210
2. MRS. RUPALI CHANDRAKANT NIKALJE
Age: 46 years, Occ: Service,
R/at: 304, Laxmi Krupa CHS,
Lokmanya Tilak Colony,
Dadar East Mumbai-400 014 — Applicants

That LATE ANURADHA CHANDRAKANT NIKALJE was the mother of Applicants who expired on 12-01-2025 at Apollo Hospitals Enterprises Ltd., CBD Belapur, Navi Mumbai, The Property Description Standing in The Name of Deceased Is Attached Herewith.

**SCHEDULE OF PROPERTY 'A'**

Name of the Property Holder:
LATE ANURADHA CHANDRAKANT NIKALJE

Flat No. B-401, 4th Floor, B Wing, VAIBHAVSHALI CHSL., admeasuring about 40.89 Sq. mtrs. equivalent to 51.09 sq. mtrs. of super covered area, Plot no. 05, Sector no. 11, situated and lying at Kharghar, Taluka Panvel, Dist. Raigad 410210, Maharashtra, within the limits of Panvel Municipal Corporation, in the Jurisdiction of Registration Sub District of Panvel, District Raigad.

Agreement Value of Property Rs. 5,36,250/- (Rupees Five Lakhs Thirty-Six Thousand Two Hundred & Fifty Only).

Whereas the above-named applicants have filed present misc. application for heirship certificate under Bombay regulation VIII of 1827, the court of civil judge (S.D.) Panvel.

You the members of public are hereby given public notice to appear in the court of civil judge (S.D) Panvel in person or by pleader duly instructed and to file your say/ objections if any Public Notice within 30 days from the date of publication of public notice, failing which the said application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given under the hands and seal of the court this 5 Day of 12 2025

**SD/-** **Jr.Clerk** **Civil Court S.D. Panvel** — Court Seal — **SD/-** **Asst.Sutped** **Civil Court S.D. Panvel**

# कळंबोली स्टिल मार्केट येथील हत्येचा गुन्हा उघड अवघ्या २४ तासात आणला उघडकीस ; आरोपी अटकेत


**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली सर्कलकडुन बिमा कॉम्प्लेक्सकडे केंद्रिय भंडारम निगम बोर्डचे समोरील रस्त्यावर इसम नामे रत्नेशकुमार राजकुमार जैस्वाल यास अनोळखी इसमांनी जिवे ठार मारण्याचे उददेशाने हाताबुक्यांनी व लाकडी दांडक्याने डोक्यात व इतर ठिकाणी मारहाण करून त्यास गंभीर स्वरूपाच्या दुखापती पोहचविल्याने त्यास दवाउपचारासाठी एमजीएम. हॉस्पीटल, कामोठे येथे दाखल केले असता डॉक्टरांनी त्यास तपासुन दव-ाउपचारास दाखल करण्यापुर्वी मयत झाल्याचे घोषीत केले. सदर प्रकरणी कळंबोली पोलीस ठाणे गुन्हा नोंद केला होता. याप्रकरणी सदर गुन्ह्यातील आरोपींना अवघ्या २४ तासात अटक करण्यात आली आहे.

सदर खूनासारख्या गंभीर स्वरूपाच्या गुन्हयातील अनोळखी आरोपी इसमांचा शोध घेणेकामी पोलीस आयुक्त, नवी मुंबई मिलींद भारंबे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, दिपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, सचिन गुंजाळ यांचे मार्गदर्शनाखाली तसेच सपोआ, गुन्हे शाखा, अजयकुमार लांडगे, यांचे परिवेक्षणाखाली गुन्हे शाखा, कक्ष ३ पनवेल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश काळदाते यांचे नेतृत्वाखाली सपोनि पवन नांद्रे, पोउपनि अभयसिंह शिंदे, माधव इंगळे, सफौ अनिल पाटील, पोहवा रमेश शिंदे, प्रमोद राजपुत, अजित पाटील, निलेश पाटील, रूपेश पाटील, इंद्रजित कानु, दिपक डोंगरे, सागर रसाळ, मपोहवा हिरकणी पवार, पोना अजिनाथ फुंदे, पोशि लवंकुश शिंगाडे, प्रसाद घरत, विक्रांत माळी नवी मुंबई येथील अधिकारी व अंमलदार यांनी सीसीटीव्ही. फुटेज तांत्रिक तपासकामी तसेच प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांकडे तपास करण्यासाठी २ वेग-वेगळी पथके तयार केली होती.

त्यानुसार केलेल्या तपासात सदरचा गुन्हा दोन अनोळखी इसमांनी केल्याचे निष्पन्न झाले. त्या अनुषंगाने गुन्हयाचे घटनास्थळ व परिसरातील सीसीटिव्ही फुटेज तपासले असता सदरचा गुन्हा स्कुटी वरून आलेल्या दोन अनोळखी इसमांनी केल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले. गुन्हयाचे तांत्रिक तपासात सदर इसमांनी गुन्हा करण्यासाठी वापरलेल्या स्कुटीबाबत माहिती घेवून त्याव्दारे गुन्हयाचा तपास करण्यात आला. व आरोपी मोहम्मद चाँद शाबीर शेख, वय २५ वर्षे, कळंबोली तसेच जुएफ जमिल ईलियास शेख, वय २५ वर्षे, कळंबोली या आरोपींना विश्वासात घेवून त्यांचेकडे गुन्हयाच्या अनुषंगाने तपास केला असता कळंबोली स्टिल मार्केट सर्व्हिस रोड येथे उभे असलेल्या तृतीयपंथी यांचे सोबत वाद सुरू झाला. सदरचा वाद मिटविण्यासाठी मयत इसम रत्नेशकुमार जैसवार व त्याचे मित्र आल्याने त्याचा राग मनात धरून त्यांनी मयत रत्नेशकुमार जैसवार यांच्याशी वाद घालुन त्यांनी मयत याचे खानावळीचे बाजुस पडलेले लाकुड घेवून रत्नेशकुमार यास जिवेठार मारण्याचे उद्देशाने त्याचे डोक्यावर, छातीवर व इतर ठिकाणी मारहाण करून तेथुन पळुन गेल्याचे सांगितले. याबाबत पुढील तपास गुन्हे शाखा कक्ष ३ पनवेल करीत आहेत.

# पनवेल महानगरपालिकेतर्फे जागतिक दिव्यांग दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका दिव्यांग कल्याण विभागातर्फे जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून दिनांक ३ डिसेंबर, बुधवार २०२५ रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम कळंबोली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे सकाळी १०.०० ते दुपारी ५.०० वाजेपर्यंत होणार आहे.

महानगरपालिकेकडून दिव्यांग बांधवांसाठी घेण्यात येणाऱ्या या कार्यक्रमामध्ये आरोग्य शिबीर, आयुष्यमान कार्ड वाटप, प्रेरणादायी मार्गदर्शन, मनोरंजनात्मक सहभागात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. दिव्यांग बांधवाचा आत्मविश्वास वाढावा, समाजात सन्मानाने जगण्यास प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळावे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे दिव्यांग विभागाचे उपायुक्त रवीकिरण घोडके यांनी सांगितले आहे.

महापालिका नेहमीच दिव्यांग बांधवांच्या योजनांची अमंलबजावणी करण्यासाठी तत्पर राहिली आहे. याच बरोबर महापालिकेच्यावतीने दिव्यांग बांधवाच्या घरोघरी जाऊन सर्वेक्षण करून नोंदणी केली जात आहे. अशा प्रकारे नोंदणी करणारी पनवेल महापालिका ही राज्यातील पहिली महापालिका आहे. अशाच पध्दतीने येत्या काळात दिव्यांग बांधवासांठी विविध योजना महापालिकेच्यावतीने राबविण्यात येत आहेत.

जागतिक दिव्यांग दिनानिमित्तआयोजित केलेल्या या विशेष कार्यक्रमास पालिका कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त दिव्यांग बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

दिव्यांग कल्याण विभागा अंतर्गत राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजना : १) पनवेल महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग बांधवांची पनवेल महानगरपालिके मध्ये नोंदणी करणे. दिव्यांगांच्या गरजेनुसार त्यांना उदरनिर्वाह/व्यवसाय/साहित्य खरेदी करण्याकरीता निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात (छएऋद्ध/ठढऋड) व्दारे जमा केले जा-तात. २) एकूण ३० कुष्ठरोगी बांधवांना औषधी उपचारासाठी प्रती महिना रु.४,०००/- वैद्यकीय सहाय्य व उदरनिर्वाह निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात (छएऋद्ध/ठढऋड) व्दारे जमा केले जातात. ३) दिव्यांग व्यक्तीच्या विवाहाकरिता अर्थसहाय्य देण्यात येते. (फक्त एकदाच) एक व्यक्ती दिव्यांग असल्यास रु. २५,०००/- दोन व्यक्ती दिव्यांग असल्यास रु.४०,०००/- ४) दिव्यांग विद्यार्थ्यांना व्यवसायिक / पदवीत्तर शिक्षणासाठी वैद्यकीय, अभियांत्रिकी, पी.एच. डी. व एम.बी.ए असे शिक्षण घेत असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. २५,०००/- शिष्यवृत्ती स्वरुपात देण्याची योजना राबविण्यात येते. (फक्त एकदाच) ५) अतिनीव्र (बिछान्याला खिळलेला) दिव्यांग बांधवांस मासिक पेन्शन देण्यात येते. (प्रति महा रक्कम रु. ३,०००/-) ६) दिव्यांग बांधवांचे घरोघरी जाऊन सर्वेक्षण करणेबाबतची योजना सुरू आहे.

# महापालिका कार्यक्षेत्रातील कळंबोली, नवीन पनवेलमध्ये रस्ते दुरूस्तीच्या कामास वेग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नागरिकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या आदेशानूसार महापालिका कार्यक्षेत्रातील कळंबोली, नवीन पनवेलमध्ये रस्ते दुरूस्तीची कामे वेगाने सुरू केली आहेत.





त्यानूसार नवीन पनवेलमध्ये रोड क्रमांक १८, सेक्टर १ तसेच कळंबोली सेक्टर १४, सेक्टर २० अशा विविध ठिकाणी रस्ते दुरूस्तीची कामे वेगाने केली जात आहे. नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी कनिष्ठ अभियंता रात्रंदिवस रस्ते दुरूस्तीची कामे करत आहेत.

महापालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागातील रस्ते दुरूस्तीच्या कामास वेग आला असून अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे रोज या कामांचा आढावा घेत आहेत. शहर अभियंता संजय कटेकर व कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे सातत्याने विविध ठिकाणी सुरू असलेल्या रस्ते दुरूस्तीच्या कामांना भेटी देऊन कामाचा आढावा घेत आहे.

रस्ते दुरूस्तीच्या कामांमुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात असून सध्या तळोजा गाव, बालाजी इंटरनॅशनल स्कूल सेक्टर १७ कळंबोली,नवीन पनवेल रस्ता क्रमांक १,नवीन पनवेल सेक्टर १ , जुई कामोठे ,खारघर अशा विविध ठिकाणी रस्ते दुरूस्तीची कामे सुरू आहेत.

# रायगड जिल्हा रुग्णालयात आभा हेल्थ मिशन ठरतेय डोकेदुखी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

आयुष्यमान भारत डिजिटल हेल्थ मिशन अभियानांतर्गत मोबाईलच्या एका क्लीकवर घरबसल्या केस पेपरची नोंदणी करण्याची सुविधा करण्यात आली आहे. मात्र, हीच ऑनलाईन सुविधा सर्वसामान्यांसाठी डोकेदुखी ठरत आहे. टोकन नंबर मिळविण्यासाठी, तसेच केस पेपर काढण्यासाठीदेखील रांगेत उभे राहावे लागत आहे. प्ले स्टोरमधून आभा प डाऊनलोड करणे, मोबाईल नंबरने रजिस्टर करणे, क्यूआर स्कॅन करणे, टोकन मिळणे, त्यानंतर टोकन नंबर दाखवून रांगेत उभे राहून केस पेपर काढणे, ही लांबलचक प्रक्रिया रुग्णांसाठी त्रासदायक ठरत आहे.

आयुष्मान भारत हेल्थ अकाऊंट, जे एक डिजिटल हेल्थ आयडी कार्ड आहे. हे कार्ड नागरिकांना त्यांचे वैद्यकीय रेकॉर्ड्स, प्रिस्क्रिप्शन आणि चाचणी अहवाल ऑनलाइन सुरक्षितपणे साठवण्यास आणि आरोग्य सेवा पुरवणाऱ्यांशी शेअर करण्यास मदत करते. ज्यामुळे आरोग्य सेवा मिळवणे सोपे आणि कार्यक्षम होते. या कार्डाद्वारे लोकांना वेगवेगळ्या आरोग्य सेवा प्रदात्यांमध्ये त्यांच्या आरोग्य माहितीवर सहजपणे प्रवेश मिळवता येतो.

जिल्हा रुग्णालयासह आठ ग्रामीण रुग्णालय व सहा उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना तातडीने सेवा मिळावी, केस पेपर वेळेवर मिळावे, यासाठी प्रत्येक रुग्णालयातील बाह्य रुग्ण कक्षामध्ये पुरुष, महिला ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग अशा वेगवेगळ्या स्वरुपाच्या खिडक्या तयार करण्यात आल्या आहेत. या खिडक्यांमार्फत रुग्णांना सेवा देण्याचा प्रयत्न केला जातो. केस पेपरसाठी येणाऱ्या रुग्णांचे नाव, पत्ता, वय, आजार अशी वेगवेगळी माहिती घेऊन संगणकामध्ये नोंद केली जाते. त्यानंतर त्यांना केस पेपर दिले जाते. केस पेपर मिळविण्यासाठी तासन्तास उभे राहण्याची वेळ रुग्णांवर येते. रांगेत उभे राहून केस पेपर काढूनदेखील डॉक्टर जागेवर भेटण्याबाबत कायमच ओरड राहिली आहे. ही समस्या सोडविण्यासाठी आरोग्य विभागाने ऑनलाईनचा आधार घेतला आहे. आयुष्यमान भारत डिजीटल मिशन अभियानांतर्गत उपक्रम हाती घेण्यात आला आहे.



आयुष्यमान भारत डिजिटल हेल्थ मिशन अभियानांतर्गत मोबाईलच्या एका क्लीकवर घरबसल्या केस पेपरची नोंदणी व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासाठी प्ले स्टोरमधून आभा प डाऊनलोड करणे, मोबाईल नंबरने रजिस्टर करणे, क्यू आर स्कॅन करणे, टोकन नंबर मिळविणे, त्यानंतर टोकन नंबर दाखवून केस पेपर रुग्णालयातून घेणे ही प्रक्रिया आहे. मात्र, ही प्रक्रिया सर्वसामान्यांसाठी डोकेदुखी बनली आहे. केस पेपर काढण्यासाठी टोकन नंबर घेणे आवश्यक आहे. त्यासाठी मोबाईलद्वारे क्यू आर कोड स्कॅन करणे गरजचे आहे. यासाठी रुग्णालयातील आभा कक्षामध्ये रांगेत उभे राहण्याची वेळ सर्वसामान्यांवर येत आहे. रांगेत उभे राहण्याच्या समस्यांपासून मुक्ती मिळावी, यासाठी हा उपक्रम हाती घेतला आहे. मात्र, टोकन नंबर मिळविण्यासाठीच रांगेत उभे राहावे लागत आहे. या लांबलचक प्रक्रियेमुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत.

# पाच लाखांची घरफोडी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उलवे येथे पाच लाख २८ हजारांच्या घरफोडीची घटना घडली असून याप्रकरणी उलवे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सेक्टर १८ येथे राहणाऱ्या आनंदसिंग राठोड यांचे घर १५ दिवसांपासून बंद होते. ते परत आले असता घरफोडी झाल्याचे लक्षात आले. चोरट्याने बाल्कनीतून प्रवेश करून पाच लाख २८ हजारांचा ऐवज चोरला आहे. याबाबत त्यांनी उलवे पोलिसांकडे तक्रार करताच गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान उलवे परिसरात सतत चोरीच्या घटनांमुळे रहिवाशांमध्ये असुरक्षिततेची भावना आहे.

# रेल्वेच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर रेल्वे स्थानकाजवळ लोकलच्या धडकेत १६ वर्षीय मुलाने आत्महत्या केली होती. पण मृत्यूपूर्व तयार केलेल्या व्हिडिओत मुलाला आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याची बाब समोर आली आहे. रेल्वे खारघर बेलापूर स्टेशनदरम्यान राकेश घाची हा तरुण जखमी अवस्थेत सापडला होता. रेल्वे पोलिसांनी त्याला पनवेल उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले होते. मात्र, त्याला मृत घोषित करण्यात आले. वडिलांची तक्रार पनवेल रेल्वे पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत राकेशला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचे उघड झाले होते.

# महापरिनिर्वाण दिनासाठी सुरक्षेसह सेवासुविधांची काटेकोर अंमलबजावणी करा : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

देशभरातून महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी चैत्यभूमी परिसर तसेच मुंबईत लाखोंच्या संख्येने अनुयायी येतात. येणाऱ्या अनुयायांची सुरक्षितता आणि सोयीसुविधांसाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे. चैत्यभूमी येथे उभारल्या जाणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासंदर्भात विविध सूचना प्राप्त झाल्या असून याबाबत समन्वय समिती स्थापन करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाला ज्ञान दिले आणि जागरूक केले. या जागरूकतेला अधिक बळकटी देण्याचा तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पुढे नेण्याचा प्रयत्न महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने आपण सर्वजण करुया, असेही आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पूर्वतयारीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज सह्याद्री अतिथीगृह येथे आढावा बैठक झाली. या बैठकीस सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, माजी मंत्री विजय गिरकर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, बेस्ट'च्या महाव्यवस्थापक सोनिया सेठी, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल, तसेच विविध विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे यांच्यासह विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, चैत्यभूमी परिसरात योग्य मंडप व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय, तसेच इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. दादर व आसपासच्या परिसरात वाहतूक पोलीस यंत्रणांनी रहदारीचे योग्य नियोजन आणि नियंत्रण करावे. अनुयायांना मार्गदर्शन मिळावे यासाठी जागोजागी सूचनाफलक लावावेत. तसेच, नागरिकांना सुलभ प्रवासासाठी बेस्टतर्फे अतिरिक्त बससेवा उपलब्ध ठेवावी. या बैठकीच्या निमित्ताने अनेक चांगल्या व उपयुक्त सूचना प्राप्त होतात. यामुळे मूलभूत बाबींवर लक्ष देत दरवर्षी अधिक चांगले काम करता येते, तसेच काही उणीवा राहिल्या असतील तर त्या दूर करण्याचा प्रयत्न करता येतो. उत्तम नियोजन आणि समन्वयासाठी ही बैठक आयोजित केली जात असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

बैठकीत येणाऱ्या अनुयायांची व्यवस्था, सुरक्षेची व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, बस सेवा, भोजन व्यवस्था, चैत्यभूमी परिसरात वॉटरप्रूफ मंडप, स्वच्छतागृहे, वाहतूक व्यवस्थेचे नियोजन, पुष्पवृष्टी, सीसीटीव्ही कॅमेरे आणि इतर सर्व सोयीसुविधा यांचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त तयार करण्यात आलेल्या पोस्टरचे अनावरण तसेच माहिती पुस्तिकेचे प्रकाशन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

# हरवलेली सोन्याची कुडी परत करून रिक्षा चालक भोनकर यांनी जपली माणुसकी

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगाव शहरात हल्लीच्या धकाधकीच्या जीवनात माणुसकी आणि प्रामाणिकपणा दुर्मिळ होत चालला आहे, अशी सर्वांचीच तक्रार. मात्र अशा काळात एका रिक्षाचालकाने दाखवलेली प्रामाणिक कृती अनेकांच्या मनात आशेचा दिवा प्रज्वलित करून गेली.

सेवानिवृत्त शिक्षिका प्रतिभा वडेकर खांदाड येथे हळदीच्या कार्यक्रमाला जाताना रिक्षेतून प्रवास करत होत्या. सोबत त्यांच्या मैत्रीणी सेवानिवृत्त शिक्षिका मंजिरी बापट आणि रश्मी अंबुर्ले शिक्षिका होत्या. परंतु घरी परतल्यावर त्यांच्या कानातील अंदाजे पाच ग्रॅमची सोन्याची कुडी हरवल्याचे त्यांना जाणवले. तिन्ही मैत्रिणींनी शोधाशोध केली, मार्ग तपासला; पण कुडीचा काहीच पत्ता लागला नाही.

ही चर्चा रिक्षाचालक ऐकत होता. ते त्यांच्या लक्षात होते. तेही चिंतेत होते. दुसऱ्या दिवशी रिक्षा चालक संदीप बाळकृष्ण भोनकर यांनी आपल्या रिक्षेची रोजची साफसफाई करत असताना, एका कोपऱ्यात चमकणारी वस्तू त्यांच्या नजरेस पडली. हातात घेतली, पाहिलं तीच ती हरवलेली सोन्याची कुडी!

क्षणाचाही विलंब न लावता भोनकर थेट वडेकर यांच्या घरी गेले. ताई, तुमची कुडी सापडली आहे, असे सांगत त्यांनी ती सोन्याची कुडी त्यांच्या हातात दिली. हरवलेली वस्तू हातात पडताच वडेकर यांच्या डोळ्यांत क्षणभर पाणी तरळले कृतज्ञतेचे, समाधानाचे आणि माणुसकी अजूनही जिवंत असल्याचे समाधान देणारे अश्रू... त्यानंतर त्यांनी संदीप भोनकर यांना बक्षीस देऊ केले. परंतु ते त्यांनी नम्रपणे नाकारले.

वडेकर मॅडम यांनी भोनकर यांचे मना-पासून आभार मानले. केवळ सोन्याची कुडी मिळाली म्हणून नव्हे तर समाजात अजूनही प्रामाणिकपणाचा ठेवा जपणारे लोक आहेत, हे त्यांना आणि त्यांच्या मैत्रिणींना पुन्हा एकदा जाणवले.

माणगावातील रिक्षा चालकांनी यापूर्वीही अनेकदा हरवलेल्या अनमोल वस्तू, मोबाईल, पर्स ते महागड्या सोन्याच्या दागिन्यांपर्यंत सर्व काही परत करून प्रामाणिकपणाचे असंख्य दाखले दिले आहेत. भोनकर यांची ही कृती त्या परंपरेतील नवा उजळणारा अध्याय.

आज समाजात अशी एखादी घटना घडली, की मनाला दिलासा मिळतो... माणुसकी अजून जिवंत आहे आणि ती अशाच साध्या, कष्टकरी, प्रामाणिक माणसांमुळे जिवंत राहिली आहे.

रिक्षा चालक संदीप बाळकृष्ण भोनकर यांच्या या संवेदनशील आणि प्रामाणिक कृतीचे सर्वत्र कौतुक होत असून, माणगावकरांच्या मनात त्यांनी खरोखरच आपली जागा सोन्यासारखी जपली आहे.